पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक १६**
**सभावृत्तांत**

दिनांक - १५/०१/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १५/०१/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सुपे आशा रविंद्र – सभापती
२) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
४) मा. जयश्री वसंत गावडे

या शिवाय मा.गावडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला.

विषय क्र.४) सांगवी येथील डी.पी.रस्त्याबाबत - मा.जयश्री गावडे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.जयश्री गावडे अनुमोदक : मा.आशा सुर्यवंशी

नामदेव ढसाळ यांचे तसेच अशोक शाळू व संभाजी मोहिते यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून बुधवार दिनांक २२/०१/२०१४ दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - बुधवार दिनांक २२/०१/२०१४ दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

मा.शहर सुधारणा समिति

कार्यपत्रिका क्रमांक १६

**सभावृत्तांत**

( दिनांक १५/०१/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - २२/०१/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २२/०१/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सुपे आशा रविंद्र – सभापती
२) मा. साळुंखे सविता सुरेश
३) मा. तानाजी विठ्ठल खाडे
४) मा. उषा संजोग वाघेरे (पाटील)

या शिवाय मा.गावडे, मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – प्र.समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

दिनांक ०१/०१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ५३ विषय क्रमांक - १

दिनांक - २२/०१/२०१४ विभाग - नगररचना

सूचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.उषा वाघेरे

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/०६/११००/२०१३, दि.०६/११/१३

२) उपसंचालक, नगररचना यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/०६/११/२०१४, दि.२०/०१/२०१४

विषय - मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड शाळा) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन करणेबाबत...

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये सदरचे विषयपत्र मागे घेणेबाबत विनंती केलेली असल्याने विषय क्र.१ चे विषयपत्र मागे घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४ विषय क्रमांक - २

दिनांक - २२/०१/२०१४

सूचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंखे

संदर्भ : १) मा.चारुशिला कुटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय - आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजनेनुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/1 पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार

प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले आहे. सदरचे आरक्षण पिंपरी चिंचवड मनपा नियंत्रण क्षेत्रात येत आहे. शाळेसाठी आरक्षित जागा आरक्षणामधून वगळून रहिवासी निवासी विभागात समाविष्ठ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५ विषय क्रमांक - ३

दिनांक - २२/०१/२०१४ विभाग–नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.उषा वाघेरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/२/कावि/४५८/१३ दि.३०/१२/१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध मागासवर्गीय कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते २ योजनांना मान्यता तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजना घटक योजना क्र.१ सुधारीत शिष्यवृत्ती वाटप योजनेत (सुधारीत) शिष्यवृत्ती म्हणून इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांना र.रु.१,५००/- ऐवजी र.रु.२,०००/- व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांसाठी र.रु.२,५००/- ऐवजी र.रु.३,०००/- देणेस तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत घटक योजना क्र.७ मागासवर्गीय युवकांना विविध व्यावसाय प्रशिक्षण देणे या योजनेच्या नावात मागासवर्गीय युवकांना शासनाकडील मान्यताप्राप्त प्रपत्र अ नुसार अर्हताधारक (V.T.P.) (Vocational Training Provoider) संस्थांमार्फत शासनमान्य अभ्यासक्रमाचे शासनमान्य दराने प्रशिक्षण देणे याप्रमाणे पूर्वीच्या योजने ऐवजी सुधारणा करण्यास २) पूर्वीच्या योजनेच्या अटी शर्तीमध्ये सुधारणा करुन पुढील प्रमाणे अटी व शर्ती निश्चित करणेत याव्यात. **अ) लाभार्थी बाबत अटी शर्ती** – मागासवर्गीय कल्याणकारी योजना क्र.७ मधील लाभार्थींच्या अटी शर्ती मधील अ.क्र.५ अर्जदारास एकूण फी च्या १०% सहभाग शुल्क संबंधित प्रशिक्षण संस्थेकडे जमा करावे लागेल ही अट, अटी शर्तीमधून वगळण्यात यावी. **ब) V.T.P.बाबत अटी शर्ती** – १. V.T.P. संस्था यांना ३ वर्षापेक्षा जास्त वर्षाचा शासकीय योजनेतील प्रशिक्षणाचा अनुभव असावा. २. V.T.P. संस्था ही P.C.M.C. च्या हद्दीतील असावी. ३. संस्थेस समाजकल्याण विभागात मनपा, जिल्हापरिषद किंवा नगरपरिषद येथीली योजनेत प्रशिक्षणाचा अनुभव असावा. ४. संस्थेची वार्षिक उलाढाल ही ४० लाखापेक्षा जास्त असावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या योजनेनुसार मनपा कार्यक्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणा-या विद्यार्थीनींना अनुदान रक्कम देणेत येत असते त्याच धर्तीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देखील अनुदान देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – ५६ विषय क्रमांक - ४

दिनांक - २२/०१/२०१४

सूचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.उषा वाघेरे

संदर्भ : मा.जयश्री गावडे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव -

सांगवी मधुबन कॉलनी येथील गणपती चौक ते गल्ली नं.१० कडे जाणारा मुख्य रस्ता म.न.पा.विकास आराखडयामध्ये १२.०० मी.नियोजित आहे. तरी सदर रस्त्यावरील वाहतुकीचा विचार करता व भविष्यात होणारे इतर पर्यायी रस्ते यांचा विचार करता गणपती चौकात गल्ली नं.१० कडे जाणारा १२.०० मी. रस्त्याची रुंदी कमी करुन ९.०० मी. पर्यंत करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१००/२०१४
दिनांक - /०१/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.1.67\e\e drive\Nagersachiv1\Shahar Sudharana-13-14\proceeding 16_Shahar Sudharana 1.doc